**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,**

**वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी आणि भारत मौसम विभाग**

**ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsparbhani@gmail.com**

**लातूर कृषी हवामान सल्ला** **शुक्रवार, दिनांक— १५ जानेवारी २०२१**

| हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक १६ ते २० जानेवारी, २०२१) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | १६/०१ | १७/०१ | १८/०१ | १९/०१ | २०/०१ |
| पाऊस (मिमी) | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० |
| कमाल तापमान (अं.से.) | ३२.० | ३२.० | ३३.० | ३३.० | ३३.० |
| किमान तापमान (अं.से.) | १८.० | १९.० | १९.० | १९.० | १९.० |
| ढग स्थिती (आकाश) | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ५८ | ५४ | ५८ | ६४ | ६१ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ३० | ३१ | ३२ | ३१ | ३२ |
| वा-याचा वेग (किमी / तास) | ११ | ११ | १५ | १९ | ७ |
| वा-याची दिशा | अगनेय | अगनेय | दक्षिण | दक्षिण | पंश्चीम |

| हवामानाचा इशारा | हवामान अंदाजानुसार जिल्हयात पुढील पाच दिवस आकाश स्वच्छ राहील. | |
|---|---|---|
| पिकांचे नाव | अवस्था | कृषि हवामान सल्ला |
| कापूस | वेचणी अवस्था | कुठल्याही परिस्थितीत कापसाची फरदड (खोडवा) घेऊ नये. कापूस पिकाची शेवटची वेचणी पूर्ण झाल्यावर कापूस पिकाचा पालापाचोळा, पराटया जमा करून त्यांची योग्य ती विल्हेवाट लावावी. |
| तूर | काढणी अवस्था | वेळेवर पेरणी केलेल्या तूर पिकाची काढणी व मळणी करून घ्यावी. |
| रब्बी ज्वारी | वाढीची अवस्था | रब्बी ज्वारी पिकात पाणी व्यवस्थापन करावे. उगवण झालेल्या रब्बी ज्वारी पिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी थायामीथोक्झाम १२.६ % + ल्यामडा सायहालोथ्रीन ९.५ झेडसी ५ मीली किंवा स्पिनेटोरम ११.७ एससी ४ मीली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| गहू | वाढीची अवस्था | गव्हाच्या पिकात उंदरांचा प्रादुर्भाव दिसुन आल्यास याच्या नियंत्रणासाठी झिंक फॉस्फाईड १ भाग + गुळ १ भाग + ५० भाग गव्हाचा भरडा व थोडेस गोडतेल मिसळुन हे मिश्रण उंदराच्या बिळात टाकुन बिळे बंद करावीत. |
| केळी | फळ लागणे अवस्था | केळी बागेत फळाची प्रत चांगली राहण्यासाठी केळीच्या घडाणा झाकून घ्यावे. मृग बाग लागवड केलेल्या केळी बागेत सिगाटोगा रोगाच्या व्यवस्थापनासाठी प्रोपीकोनाझोल १० मीली + स्टिकर प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| आंबा | मोहोर लागणे अवस्था | आंबा फळबागेत रसशोषन करणाऱ्या किडींच्या व्यवस्थापनासाठी डायमेथोएट ३० % १६ मीली किंवा थायमिथोक्झाम २५ % डब्ल्यूजी २ ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

| | | |
|---|---|---|
| द्राक्षे | घड लागणे अवस्था | द्राक्षे बागेत भुरी रोग व्यवस्थापन करण्यासाठी योग्य ते नियंत्रण करावे. |
| भाजीपाला | वाढीची अवस्था | मिरची पिकात भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास त्याच्या व्यवस्थापनासाठी मायक्लोब्युटनिल १०% डब्लूपी १० ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. मिरची भाजीपाला पिकात रसशोषण करणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास त्याच्या व्यवस्थापनासाठी पायरीप्रॉक्सीफेन १०% ईसी ४ मीली किंवा फेनप्रोपाथ्रीन १०% ईसी ४ मीली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| फुल शेती | काढणी अवस्था | काढणीस आलेल्या फुलांची काढणी करून घ्यावे. |
| तुती रेशीम उद्योग | -- | एकरी ६५ टन तुती पानाचे उत्पादन व्हि-१ वाणापासून मिळते.फाद्यांचे त्याच्या दुप्पट म्हणजे १३० टन प्रती हेक्टर प्रती वर्षे पण त्यासाठी जमिनीचा सामू ६.५ ते ७.३ दरम्यान असावा व कार्बन: नायट्रोजन प्रमाण ०.५ च्या वर असावे.त्यासाठी हिरवळीचे खात, गांडूळ खात ५ टन प्रती हेक्टर म्हणजे २ टन प्रती एकर प्रमाणे द्यावे.वर्षातून दोन वेळा जुने व जानेवारी मध्ये पट्टा पद्धत तुती लागवडीत बारू किंवा ठेंचा ८ किलो प्रती एकर प्रमाणे पेरून १.५ महिन्यानी जमिनीत गाडावे. |
| सामुदायिक विज्ञान | | वनामकृवि परभणी विकसित अल्प खर्चीक तंत्रज्ञान बास्केटचा उपयोग अद्रक पिक प्रणालीतील महिला केंद्रित कार्यातील कष्ट कमी करण्यासाठी व उत्पादन वाढवण्यासाठी करण्यात येते. |

**सदर कृषी सल्ला पत्रिका वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषी मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.**